**उलटतपास आरोपी क्र.२, ४ ते ६ यांच्यातर्फे वकील श्री.एस.एन.भणगे यांचेतर्फे सुरु –**

०२. हे म्हणणे खरे आहे की सन २०१३ मध्ये माझी श्रीदेव वेतोबा देवस्थान कमिटी यावर विश्वस्त म्हणून नेमणूक झालेली होती. ट्रस्टवरील सर्व विश्वस्तांचा कालावधी हा सन २०१३ ते सन २०१८ असा होता. हे म्हणणे खरे आहे की देवस्थान कमिटीच्या अद्यापपर्यंत आम्ही निवडणूका घेतलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की विश्वस्तांपैकी एक विश्वस्त आरोपी क्र. १ – गणेश रघुनाथ रेगे हे दि. २३/०७/२०१७ रोजी मयत झाले आहेत. हे म्हणणे खरे नाही की गणेश रेगे हे श्रीदेव वेतोबा देवस्थान कमिटीचे अध्यक्ष होते. अध्यक्ष कोण होते हे मी नक्की सांगू शकत नाही. माझ्या म्हणण्यानुसार देवस्थान कमिटीचा एखादा विश्वस्त जर मयत झाला तर त्याच्या जागी नवीन विश्वस्त नेमण्याची आवश्यकता नसते. विश्वतांपैकी एक विश्वस्त पुरुषोत्तम दळवी यांनी विश्वस्त म्हणून राजीनामा दिला किंवा कसे हे मला नक्की सांगता येणार नाही. एखाद्या विश्वस्ताने राजीनामा दिल्यास त्याच्या जागी नवीन विश्वस्त नेमला जातो किंवा कसे हे मला नक्की सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी स्वतः, माझ्यासोबत विश्वस्त डॉ.साळगावकर व विश्वस्त सावळराम टांक्कर असे आम्ही सर्व श्रीदेव वेतोबा देवस्थान कमिटीचा मनमानी कारभार करतो. हे म्हणणे खरे आहे की काही मानकरी व इतर यांनी विश्वस्तांविरुध्द धर्मादाय सहाय्यक आयुक्त कोल्हापूर यांच्याकडे अर्ज क्रमांक २८/२०२२ दाखल केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की सदर केसमधील आरोपी क्र.२ बाबूराव अनंत आरोलकर हे त्या अर्जामध्ये अनेक अर्जदारांपैकी एक अर्जदार आहेत. हे म्हणणे खरे आहे की बाबूराव आरोलकर यांनी माझ्याविरुध्द अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम (अॅट्रॉसिटी अॅक्ट) खाली केस दाखल केली होती. मी पोलीस पाटील मधुसुधन सुतारमेस्त्री यांना ओळखतो. मधुसुदन गजानन सुतार मेस्त्री यांनी आरोपी क्र.२–बाबूराव अनंत आरोलकर यांच्या मुलाविरुध्द त्यांच्या मुलीला पळून नेल्याबाबत लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा (POCSO) अंतर्गत केस दाखल केली आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. त्या केसमध्ये माझी मुलगी साक्षीदार होती किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. प्रस्तुत केसमध्ये ज्यामध्ये मी साक्षीदार म्हणून आज न्यायालयात हजर आहे ती केस करण्यामध्ये पोलीस पाटील आरवली यांनी पुढाकार घेतला आहे याची मला माहिती आहे. मा. सत्र न्यायालय, सिंधुदुर्ग यांनी पोलीस पाटील, आरवली यांनी आपल्या मुलीला मारहाण करुन खोटी केस दाखल करण्यास भाग पाडले म्हणून त्यांच्याविरुध्द केस दाखल केली आहे किंवा कसे हे मला माहिती नाही. मा. सत्र न्यायालय, सिंधुदुर्ग यांनी पोलीस पाटील, आरवली यांच्या मुलीला न्यायालयातून शासकीय रुग्णालय, ओरोस यांच्याकडे वैद्यकीय तपासणीसाठी पाठविले किंवा कसे हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की पोलीस पाटील, आरवली यांच्या मुलीला जेव्हा मा. सत्र न्यायालय, सिंधुदुर्ग यांनी शासकीय रुग्णालय ओरोस येथे पाठविले तेव्हा मी तेथे हजर होतो. हे म्हणणे खरे नाही की सदर केसमधील आरोपी क्र. १ यांनी या न्यायालयात मी त्यांना मारहाण केल्याबाबत फौजदारी केस

माझ्याविरुध्द दाखल केली होती. हे म्हणणे खरे नाही की पुरुषोत्तम दिक्षित यांना बागकर यांनी मारहाण केली म्हणून मी फौजदारी केस दाखल केली होती. त्या केसमध्ये माझी याच न्यायालयामध्ये साक्ष झाली होती व ती साक्ष ॲड. गोडकर यांनी घेतली होती किंवा कसे हे मला आता आठवत नाही. माझ्या म्हणण्यानुसार या केसमधील माझ्या आजरोजीच्या साक्षी व्यतिरिक्त मी कधीही साक्ष देण्यासाठी न्यायालयात आलेलो नाही.

०३. मी आरोपी क्र. ३ – बाळकृष्ण गोविंद येसजी यांना ओळखतो. आरोपी क्र. ३ बाळकृष्ण गोविंद येसजी यांनी चंद्रकांत आरोलकर व देवस्थान कमिटी विरुध्द नि.दि.मु.क्र.१३/२००० या न्यायालयात दाखल केला होता किंवा कसे हे मला माहिती नाही. त्या केसमध्ये देवस्थान यांनी दिलेली कैफियत ही चुकीची आहे म्हणून आमची कैफियत दाखल करुन घ्यावी असा आम्ही अर्ज दिला होता किंवा कसे हे मला आता आठवत नाही. तो अर्ज न्यायालयाने रद्द केला किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

**आरोपी क्र.२, ४ ते ६ यांच्यातर्फे वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

सही/–

दिनांक– २८/०७/२०२३

(के.के.पाटील)
न्यायदंडाधिकारी वर्ग १, वेंगुर्ला.